# पोलीस कल्याण निधीमधुन मिळणारे फायदे

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्रमांक पोमसं/२८-अे/४९३७/पो.क.नि.नियमावली/४२/२०१२, दि.३०/७/२०१२ अन्वये महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी सुधारीत नियमावली-२०१२ नुसार निधीचा विनीयोग नियम क्रमांक ९ (१) (ब) मधील तरतुदीनुसार पुस्तक अनुदान पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाचे अधिकारी / कर्मचारी तसेच लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचारी (पोलीस कल्याण निधीचे सभासद) यांची २ मुले पात्र व्यक्ती यांना पाठय-पुस्तके खरेदी करण्यासाठी, ही सुविधा, ज्या शैक्षणिक वर्षात लागू होते असेल (फक्त चालु वर्षाकरिता) वार्षिक परिक्षेत खालील विवरणपत्रातील नमुद गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या मुला-मुलींना नमुद दरानुसार दिली जाईल.

| अ. क्र. | अभ्यासक्रम (शैक्षणिक वर्गवारी) | पुस्तक अनुदानाकरिता पाहिजे असलेली टक्केवारी | पुस्तक अनुदानाचे दर |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता ५ वी १० वी पर्यंत | ७५% किंवा अ/ब ग्रेड असले तर ६ मुख्य क्रमिक विषयापैकी किमान ४ विषयात ब-१ श्रेणी असणे आवश्यक | १०००/- |
| २ | इयत्ता ११ वी व १२ | ७५% | २०००/- |
| ३ | पदवी व पदव्युत्तर (कला, वाणिज्य व विज्ञान), MBA, BBA, BCA, MCA, DBM, D-Pharm, B-Pharm, M-Pharm, D.ed, B.ed, M.ed, CA, BSc(Agri), BSc(IT), BMS, Computer Degree & Diploma, ITI, etc. | ७५% | ३०००/- |
| ४ | अभियांत्रिकी पदविका(Diploma) | ५५% | ३०००/- |
| ५ | वैद्यकीय पदविका (Diploma) | ५०% | ३०००/- |
| ६ | अभियांत्रिकी पदवी (Degree) | ५५% | ७०००/- |
| ७ | वैद्यकीय पदवी (Degree) | ५५% | १५०००/- |

**पुस्तक अनुदानाकरिता दर वर्षाकरिता दिनांक १/७ ते ३१/८ पर्यंत अर्ज मागविण्यात येत असतात या दिनांकानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जात नाही.**

अर्ज पाठवितांना खालील सुचनांचे पालन करुनच अर्ज पाठवावा.

१. सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्येच अर्ज सादर करावा. साध्या कागदावरील अर्ज स्विकारला जाणार नाहीत.
२. अर्ज हे ठाणेदार / इन्चार्ज यांचे मार्फतीनेच या कार्यालयात सादर करावेत. सरळ पाठविलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाही.
३. अर्जासोबत विद्यार्थ्याने पास केलेल्या इयत्तेच्या गुणपत्रकांची छायांकीत व ठाणेदार / इन्चार्ज यांनी साक्षांकीत केलेली प्रत जोडणे बंधनकारक आहे. साक्षांकीत प्रत नसल्यास पुस्तक अनुदान मिळणार नाही.
४. ठाणेदार / इन्चार्ज यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे विहीत नमुन्यातील सर्व अर्ज एकत्रीत करुन या कार्यालयास सादर करावेत.
५. गुणपत्रिका / मार्कशिट ही दरवर्षी पाठवितांना **साक्षांकीत (Attested) केल्याशिवाय पुस्तक अनुदान मिळणार नाही याची नोंद घ्यावी.**